NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक ३०.१०.२०२६ शुक्रवार

१) मा. पोलीस आयुक्तांचे हस्ते उत्कृष्ट तपास करणारे पोलीस अधिकारी, अंमलदार व पैरवी अधिकारी यांचा गौरव :–

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणारे, पोलीस ठाणे यशोधरानगर, कळमणा, वाठोडा, पारडी, आर्थिक गुन्हेशाखा, वाहतुक परिमंडळ पारडी येथील उत्कृष्ट काम करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार आणि कोर्ट पैरवी अंमलदार यांचा आज दिनांक ३०.१०.२०२६ रोजी पोलीस भवन येथे प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला.

ज्यामध्ये, यशोधरानगर पोलीसांनी डागा हॉस्पिटल येथुन चोरी झालेले नवजात बाळाचा शोध घेऊन, त्यास त्याचे आई वडीलांचे ताब्यात दिल्याने, वपोनि युनुसचांद शेख, सपोनि दिलीप पाटील, पोउपनि अशोक हटकर, दत्तु गेठे, श्रीमती वनिता गर्जे, पोहवा मंगेश गिरी, अमोल भांबुलकर व अशोक तायडे यांचा, तसेच कळमणा बिट मार्शल पोलीसांनी अस्पष्ट नंबरप्लेट असलेल्या संशयास्पद वाहनाची बारकाईने तपासणी करुन वाहनचोरीचा गुन्हा उघडकीस आणल्याने पोहवा श्रीधर बरबटे व पोअं. रंजीत राठोड यांचा, तसेच वाठोडा पोलीसांनी दुखापतीसह जबरी चोरीचा गुन्हा अवघ्या ६ तासात उघडकीस आणल्याने पोउपनि अतुल पवार, पोहवा अनुप तायवाडे, पोअं वामन कालेकर, ईश्वर राठोड, सिताराम चव्हाण व विपीन पिल्लेवान यांचा, पारडी बिट मार्शल पोलीसांनी गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न करणारे इसमास सुखरुप वाचविल्याने पोअं. गणेश श्रीरामे, निलेश लंगडे व नितीन कनोजिया यांचा तसेच, आर्थिक गुन्हेशाखा पोलीसांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे दाखल फसवणुकीचे गुन्हयात तपास केल्याने व आरोपीस दोषसिध्दी झाल्याने सफौ. चंद्रशेखर वैद्य, पोहवा आशिष लक्षणे व राजेंद्र आंधळे यांचा, तसेच वाहतुक परिमंडळ पारडी पोलीसांनी एका शालेय बसमधुन धुर निघत असल्याचे बघुन, प्रसंगावधान राखुन ३० विद्यार्थ्यांना बाहेर काढुन वेळीच सुरक्षितस्थळी पोहोचविल्याने पोहवा अतुल ठाकरे व प्रमोद शेळके यांना, तसेच यशोधरानगर बिट मार्शल पोलीसांनी विषारी औषध प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न करणारे महिलेस तात्काळ रुग्णालयात दाखल करुन तिचे प्राण वाचविल्याची मोलाची कामगिरी केल्याने पोअं. रोहीत रामटेके व साजिद खान या सर्वांना प्रशस्तीपत्रक देवुन, अधिक उत्कृष्ट काम करण्यासाठी प्रोत्साहीत केले.

याप्रसंगी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सहा. पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंतराव परदेशी (दक्षिण प्रभाग), श्रीमती विनीता शाहु (उत्तर प्रभाग) तसेच अधिकारी व अंमलदार हजर होते.





२) मा. सह पोलीस आयुक्तांचे हस्ते पदोन्नती प्राप्त सफौ व पोहवा यांचा गौरव :–

आज दिनांक ३०.१०.२०२६ चे १८.०० वा. चे सुमारास, मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी पोलीस भवन येथे आयोजीत छोटेखानी समारंभात माहे ऑक्टोंबर २०२६ मध्ये नियत सेवाकाळानुसार पदोन्नती प्राप्त ०९ सहायक फौजदार व १८ पोलीस हवालदार यांना त्यांचे परिवाराचे उपस्थितीत प्रशस्तीपत्र, पुषगुच्छ देऊन त्यांचा गौरव केला. कार्यक्रमप्रसंगी मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त यांचेसह मा. श्री राहुल माकणीकर, पोलीस उपआयुक्त, मुख्यालय, नागपुर शहर तसेच, पदोन्नती प्राप्त पोलीस अंमलदार व त्यांचे परिवारातील सदस्य हजर होते. कार्यक्रमादरम्यान मा. सह पोलीस आयुक्त यांनी पदोन्नती प्राप्त सर्व सफौ. यांना स्टार तसेच पो.हवा. यांना फित लावुन त्यांचा गौरव केला तसेच, पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा देवुन, त्यांचे अभिनंदन केले.





३) मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग यांचे हस्ते उत्कृष्ट तपास करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा प्रशंसापत्र व बक्षिस देऊन सत्कार :–

मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, नागपूर शहर यांनी त्यांचे प्रभाग अंतर्गत येणारे पोलीस ठाणे यशोधरानगर व वाडी येथील उत्कृष्ट काम करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा आज दिनांक ३०.१०.२०२६ रोजी दक्षिण प्रभाग कार्यालयात प्रशस्तीपत्र व बक्षिस देऊन गौरव केला.

ज्यामध्ये, यशोधरानगर पोलीसांनी वाहनचोरीचे गुन्हयात उत्तम तपास करुन, आरोपीस ताब्यात घेऊन, त्याचेकडुन वाहनचोरी व एक घरफोडी असे एकुण दोन गुन्हे उघडकीस आणुन त्याचेकडुन ०३ दुचाकी वाहने जप्त करणारे वपोनि युनुसचांद शेख, पोउपनि आंनद पाटील, पोहवा राहुल बोंद्रे, मनिष झरकर, पोअं. शितेष चौरसिया, संदीप वानखेडे व प्रविण जाधव यांचा, तसेच वाडी पोलीसांनी बॅंक ऑफ इंडीयाचे चॅनेल गेट तोडुन चोरीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक करुन, त्याचेकडुन चोरीचे प्रयत्नाचा गुन्हा उघडकीस आणणारे सपोनि कुणाल धुरट, पोहवा रोशन फुकट, राहुल बोटरे व नागेश दासरवार या सर्वांना प्रशस्तीपत्रक तसेच बक्षिस प्रदान करुन, अधिक उत्कृष्ट काम करण्यासाठी प्रोत्साहीत केले.



(कामगिरी)

१) पाचपावली पोलीसांची कामगीरी :–

अ) वाहन चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस.

दिनांक ०२.१०.२०२६ चे १५.०० वा. ते दिनांक ०३.१०.२०६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, प्लॉट क्र. १३९, पंचशील नगर बुध्द विहाराजवळ राहणाऱ्या फिर्यादी नामे अर्चना ब्रम्हदास वानखेडे वय ३८ वर्षे यांची होंडा ॲक्टिवा दुचाकी गाडी क्र. एम.एच ४९ सीवाय ००४६ किंमती अंदाजे ५०,०००/–रू. ची त्यांचे जाऊ सौ. शिखा वानखेडे यांनी त्यांचे घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, पाचपावली तपास पथकाचे प्रभारी अधिकारी सपोनि सचिन भोंडे यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, मोतीबाग परिसरात चोरीचे वाहन घेऊन सागर उर्फ भांजा वर्मा नावाचा इसम फिरत आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून, परिसरात शोध घेतला असता, प्राप्त वर्णनाचा इसम, वर नमुद चोरीचे वाहनासह मिळुन आल्याने, त्यास थांबवुन ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नांव सागर उर्फ भांजा अशोक वर्मा वय २२ वर्षे, रा. प्लॉट क्र. ३६२, विजयनगर, कळमणा मार्केट, शितलामाता मंदीरजवळ, नागपुर असे सांगितले. त्यास त्याचे ताब्यातील दुचाकीबाबत विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहनचोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने वर नमुद गुन्हयाव्यतिरिक्त पोलीस ठाणे कळमणा हद्दीत वाहनचोरी असे एकुण ०२ वाहनचोरीचे गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील वाहन क्र. एम.एच ४९ सीवाय ००४६ व क्र. एम.एच ४९ बीपी ०७२४ असा एकुण किंमती ९०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

ब) गोडावुन फोडी करणारे आरोपींना अटक. १,९०,०००/– रु. चा मुद्येमाल हस्तगत.

पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, प्लॉट क्र. १४३८/ए, सुजाता नगर, दर्डा हॉस्पिटल जवळ राहणारे फिर्यादी राजेश हरीश उपरे वय ५४ वर्षे यांचे मिलींद नगर, महात्मा फुले शाळेजवळ अंकित हार्डवेअर नावाचे दुकान असुन, गोडावुन डॉ. आंबेडकर गार्डनजवळ आहे. दिनांक ०२.१०.२०२६ चे १५.०० वा. ते दिनांक ०३.१०.२०६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे मुलाने फिर्यादीस फोन करुन सांगितले की, आपले गोडावुन उघडे असुन, तेथे कोणीतरी निळया रंगाचे ॲपे गाडीमध्ये प्लायवुड लोड करीत आहे. अशा माहितीवरुन, फिर्यादी गोडावुनमध्ये गेले असता, गाडी दिसुन आली नाही. फिर्यादीने दुकानाबाहेर लावलेले सीसीटिव्ही चेक केले असता, गोडावुनमधुन वेगवेगळया एमएमचे प्लायवुड एकुण १६ शीट एकुण किंमती ४०,०००/– रु. चा मुद्येमाल निळया रंगाचे अल्फा प्लस ॲपे क्रं. एम.एच ४९ डी ५३६० मध्ये दोन इसम चोरी करुन घेऊन जातांना दिसुन आले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात दोन आरोपींविरूध्द कलम ३३४(१), ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, पाचपावली पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन व गुप्त बातमीदार मार्फतीने मिळालेल्या माहितीवरुन, आरोपी क्र. १) पवन मुरलीधर निमजे वय २९ वर्षे, रा. वैशालीनगर झोपडपट्टी, विवान पार्कचे मागे, पाचपावली, नागपुर २) खुशाल विठोबाजी धकाते वय २८ वर्ष रा. नाईक तलाव, बांग्लादेश, पाचपावली, नागपूर यांना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गोडावुनमध्ये संगनमताने चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन संपुर्ण मुद्येमाल व गुन्हयात

वापरलेले ॲपे मालवाहु असा एकुण किंमती १,९०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील दोन्ही कामगिरी मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग, मा. श्री राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. जितेंद्र बोबडे, दुपोनि. विवेक पडधान, सपोनि. सचिन भोंडे, पोहवा. रविंद्र राऊत, राजकुमार पाल, मुकेश यादव, सुशिल रेवतकर, पवन भटकर, राजेश कोकाटे, पोअं. अमित ठाकुर, ओमप्रकाश बुरडे, शंकर आगळे व मनोज चौधरी यांनी केली.





२) नवीन कामठी पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचे ०४ गुन्हे उघडकीस.

पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, नवीन खसाळा, प्लॉट क्र. २४, राम मंदीरजवळ राहणाऱ्या फिर्यादी नामे सौ. चंदा भैयालाल माकडे वय ४० वर्षे यांनी त्यांची पांढरी होंडा ॲक्टिवा दुचाकी गाडी क्र. एम.एच ४० ए.एच २७५२ किंमती अंदाजे ४०,०००/—रू. ची दिनांक १६.१०.२०२६ चे १०.०० वा. ते १८.०० वा. चे दरम्यान, पंचायत समिती कामठी येथील पार्कींगमध्ये लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, नवीन कामठी तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन तसेच गोपनिय माहितीच्या आधारे, आरोपी नामे अंश उर्फ अंशुल नितीन गजबे वय २४ वर्षे, रा. प्लॉट क्र. १९८, दत्तात्रय नगर, एनआयटी गार्डनजवळ, सक्करदरा, नागपुर यास ताब्यात घेऊन, वर नमुद गुन्ह्यासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वाहनचोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने वर नमुद गुन्हयाव्यतिरिक्त पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत होंडा शाईन क्र. एमएच ४० बीटी ०१०६ , पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत एमएच ३१ सीझेड ९६०५ तसेच जि. अमरावती, पोलीस ठाणे बडनेरा हद्दीत क्र. एमएच २७ बीपी ०५६६ असे एकुण ०४ वाहनचोरीचे गुन्ह्यांची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेले एकुण ०४ दुचाकी वाहने एकुण किंमती २,७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग, मा. श्री रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. महेश आंधळे, पोउपनि अक्षय झगडे, पोहवा. दिपककुमार चोले, पोअं. मोहम्मद नसीम, नितेश नवघडे, आकाश टेकाम व विलास चिंचुलकर यांनी केली.



३) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :– गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन व बांधुन ठेवणाऱ्या आरोपींना अटक.

दिनांक ३०.१०.२०२६ चे ०८.३० वा. ते १०.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. २ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे सदर हद्दीत, गड्डीगोदाम परिसरात एका गल्लीमध्ये बोलेरो वाहनात गोवंशीय जनावरांना कत्तलीकरीता बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, एक पांढरी बोलेरो पिकअप वाहन क्र. एमएच ३१ एफसी १२२१ दिसुन आले. वाहनाची पाहणी केली असता, त्यामध्ये गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले दिसुन आले. तसेच गल्लीलगत असलेल्या खोलीची पाहणी केली असता, तेथेही काही गोवंशीय जनावरांना कोंडुन बांधुन ठेवलेले दिसुन आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत माहिती काढली असता, जनावरे ही आरोपी क्र. १) मोहम्मद अनिस अब्दुल हमीद कुरेशी वय ४० वर्ष २) साबीर अयुब कुरेशी वय २७ वर्ष दोन्ही रा. गड्डीगोदाम मस्जिदजवळ, सदर, नागपूर तसेच पाहिजे आरोपी क्र. ३) मोहम्मद उमर मोहम्मद मेहबुब कुरेशी वय ३५ वर्ष रा. वायएमसी जिमजवळ, गड्डीगोदाम, सदर, नागपूर यांची असल्याचे निष्पन्न झाल्याने, आरोपी क्र. १ व २ यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींचे ताब्यातुन एकुण ३० गोवंशीय लहान मोठी जनावरे, ०१ मोबाईल फोन व बोलेरो वाहन असा एकुण किंमती अंदाजे १०,१०,०००/–रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद गोवंशीय जनावरे यांना गौशाळा धंतोली, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे सदर येथे आरोपींविरूध्द कलम ५, ५(ब), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम–१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)(ह)(क) प्राणी क्रुरता अधिनियम–१९६० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी क्र. १ व २ यांना अटक केली आहे. पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली, पोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सपोनि चेतन बोरखेडे, पोउपनि मनोज राऊत, सफौ. गजेंद्रसिंग ठाकुर, पोहवा नरेश तुमडाम, कमलेश गणेर, महेंद्र सडमाके, प्रविण शेळके, सुरेश तेलेवार, अर्जुन यादव, मनिष टोंग, पोअं. संदीप पांडे, मंगल जाधव व प्रविण चव्हाण यांनी केली.



४) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी :– पोलीस ठाणे बेलतरोडी येथे दाखल एम.डी. पावडर चे गुन्ह्यातील पाहीजे आरोपीस अटक.

दिनांक २४.१०.२०२६ चे १६.२० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांनी पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत आरोपी १) अनिकेत उर्फ अन्नु संजय बिहारे वय १९ वर्ष रा. प्लॉट क्र. २९, पवनशक्ती नगर, नवाज आटा चक्कीजवळ, वाठोडा, नागपूर २) तुफानसिंग बालुसिंग सिसोदीया वय ३८ वर्ष रा. ग्राम बाटखेडी, पंचायत तालावली, पोस्ट चोमेला जि. झालवा, राजस्थान ३) कृष्णा उर्फ पहेलवार सुनिल वर्मा वय १९ वर्ष रा. लोधीपुरा, बजेरीया झेंडा चौकजवळ, गणेशपेठ, नागपूर ४) राहुल उर्फ भाया राजकुमार गोंड वय ३२ वर्ष रा. प्लॉट क्र. १०८, दुर्गा मंदीरजवळ, वाठोडा, नागपूर ५) शुभम उर्फ डोरेमॉन दिलीप नरवरीया वय ३१ वर्ष रा. स्वामीनगर, दिवाण ले आऊट, मानेवाडा, नागपुर ६) कुणाल दशरथ समुद्रे वय २९ वर्ष रा. काशिबाई देऊळ, तुळशीबाग, कोतवाली, महाल, नागपूर यांना ताब्यात घेऊन, त्यांचेकडुन एकुण १,४०५ ग्राम एमडी पावडर मिळुन आल्याने, एकुण १,५४,५०,७००/–रू. चा मुद्देमाल जप्त केला होता. आरोपींविरुध्द कलम ८(क),२२(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट पोलीस ठाणे बेलतरोडी येथे गुन्हा नोंदविण्यात आला होता व गुन्हयाचा पुढील तपास गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पथक करीत असता, गुन्हयातील पाहिजे आरोपींचा शोध सुरु होता.

गुन्हयाचा अधिक तपास करतांना, गुन्हेशाखा युनिट क्रं. ६ पोलीसांनी तांत्रिक तपास करुन व खात्रीशीर माहितीवरुन, पाहिजे आरोपी नामे मोहम्मद साबीर उर्फ चाकु मेमन अली वय ३१ वर्ष रा. कामगार नगर, कमल कॉलनी, कपिलनगर, नागपुर यास छिंदवाडा, मध्यप्रदेश येथुन ताब्यात घेऊन अटक केली. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पथकाचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. श्री भरत कऱ्हाडे, सपोनि राजाभाऊ जाधव, सफौ. मुकेश खांडरे, पोअं. निलेश श्रीपात्रे, प्रफुल पारधी, विरेंद्र पांडे व चापोहवा मनिष मिश्रा यांनी केली.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे तहसील :– दिनांक ३०.१०.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे तहसील हद्दीत, मेयो हॉस्पिटल, चेस्ट ओपीडीचे गेटसमोर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयाचे बेशुध्द व आजारी अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत

घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे तहसील येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि. महेंद्र वासनिक यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.